माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : २२७/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री. सुधीर बाबुराव फटींग,
**५६५ , गांधी कन्या शाळेमागे, नवी शुक्रवारी, जि. नागपूर- ४४००३२**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक,**
**अन्न निरीक्षक घनकचरा व्यवस्थापन विभाग,**
**महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पशुचिकीत्सा अधिकारी,**
**घनकचरा व्यवस्थापन आरोग्य विभाग,**
**महानगरपालिका नागपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १६.११.२०२२**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| १६.०६.२०२२ | -- | ०४.०८.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार अपील क्र. ११३४/२०२०, दिनांक १६.०६.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १६.११.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री. फटिंग उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक,अन्न निरीक्षक घनकचरा व्यवस्थापन विभाग, महानगरपालिका, श्री. रमेश लोखंडे उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा पशुचिकीत्सा

अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन आरोग्य विभाग, महानगरपालिका श्री. गजेद्र महल्ले उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या (द्वितीय अपील क्र. ११३४/२०२०) मध्ये दिनांक १६.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून " जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहितीचे अवलोकन करण्याबाबत वारंवार विनंती केली असता, त्यांनी सदर माहितीचे अवलोकन करण्याबाबत नकार दर्शविला आहे. तसेच आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता अनुपस्थित असल्याने त्यांना संकलीत केलेली माहिती पुरविता आली नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहितीबाबत स्वारस्य असल्यास त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वसूचना देवून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सदर माहितीचे अवलोकन करुन ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामुल्य प्राप्त करुन घ्यावी. इतर माहितीच्या पृष्ठांकरीता नियमानुसार शुल्क आकारुन सशुल्क माहिती प्राप्त करावी, असे आदेशीत करून प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०४.०८.२०२२ रोजी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये, कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावरील आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, आयोगाच्या दि. १६.०६.२०२२ रोजीच्या पारित आदेशानुसार केवळ १ मुद्याची माहिती प्राप्त झाली असुन उर्वरीत माहिती तक्रारकर्ता यांना अप्राप्त आहे. अपिलार्थी यांनी मुद्या क्रमांक ३ मध्ये मागितलेली माहिती महानगर पालिका येथील एका महिला कर्मचारी विरुध्द करण्यात आलेल्या प्रशासकीय कार्यवाही संबधित असतांनाही माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्याचे दर्शवुन ती त्यांना प्रदान करण्यात आली नाही असा त्यांनी आक्षेप नोंदविला आहे. तक्रारकर्ता यांना मागीतलेली माहिती प्रदान करण्यात आली नाही, असा त्यांनी आपला आक्षेप नोंदविला आहे.

माहिती अर्जात मागितलेली माहिती ही प्रशासकीय कार्यवाही संबधित असुन वरील कागदपत्रे ही तक्रारकर्ता यांना न्यायालयीन लढाई करीता आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रं. ४ ते ७ ची माहिती अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे कलम २ (च) नुसार दस्ताऐवज उपलब्ध नसल्यामुळे माहिती प्रदान करण्यात आली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये मुद्या क्रं. ८ च्या संदर्भातील वैयक्तिक नस्ती लेखा व वित्त विभागाला दिनांक २१.०५.२०२० रोजीच्या पत्रान्वये, पाठविण्यात आले, असे नमुद करण्यात आले आहे . तक्रारकर्ता यांनी मुद्या क्रं. १ ची माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे सुनावणी दरम्यान नमुद केले आहे.

तसेच मुद्या क्रं. ३ ची माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित आहे किंवा कसे याबाबत याआधीच माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८(१) (ञ) संदर्भात **मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२, गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या**

प्रकरणात दि. ०३.१०.२०१२ रोजी निर्णय दिलेला आहे. मा. सर्वोच्च न्यायालय ICAI vs. Shaunak H. Satya, (२०११) या संदर्भात निर्णय देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयपत्राच्या परिच्छेद क्र. १२ व १३ मध्ये पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.

१२. "The Petitioner herein sought for copies of all memos, show cause notices and censure/punishment awarded to the third respondent from his employer and also details viz. movable and immovable properties and also the details of his investments, lending and borrowing from Banks and other financial institutions. Further, he has also sought for the details of gifts stated to have accepted by the third respondent, his family members and friends and relatives at the marriage of his son. The information mostly sought for finds a place in the income tax returns of the third respondent. The question that has come up for consideration is whether the above-mentioned information sought for qualifies to be "personal information" as defined in clause (j) of Section ८(१) of the RTI Act.

१३. We are in agreement with the CIC and the courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure/punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of Section ८(१) of the RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and the employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the disclosure of which has no relationship to any public activity or public interest. On the other hand, the disclosure of which would cause unwarranted invasion of privacy of that individual. Of course, in a given case, if the Central Public Information Officer or the State Public Information Officer of the Appellate Authority is satisfied that the larger public interest justifies the disclosure of such information, appropriate orders could be passed but the petitioner cannot claim those details as a matter of right."

त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या निर्णयात असे नमूद केले आहे की, "Recognizing the fact that the right to privacy is a sacrosanct facet of Article २१ of the Constitution, the legislation has put a lot of safeguards to protect the rights under Section ८(j), as already indicated. If the information sought for is personal and has no relationship with any public activity or interest or it will not sub-serve larger public



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★नागपूर★

interest, the public authority or the officer concerned is not legally obliged to provide those information. Reference may be made to a recent judgment of this Court in Girish Ramchandra Deshpande V. Central Information Commissioner and others (२०१३) १ SCC २१२, wherein this Court held that since there is no bona fide public interest in seeking information, the disclosure of said information would cause unwarranted invasion of privacy of the individual under Section ८ (१) (j) of the Act."

याच माहितीची पुनरावृत्ती करतांना मा. उच्च न्यायालय, जम्मु कश्मीर विरुध्द केंद्रीय विदयालय संघटन यांनी दिनांक ०३.११.२०२२ च्या निर्णयात सदर आदेशाबाबत पुर्नउच्चार केला असुन कुठल्याही कर्मचाऱ्याच्या अभियोग्यता तसेच त्यांचाशी संबधित माहिती त्रयस्थ पक्षाशी खाजगीपणाची अतिक्रमण करणारी आहे. ही बाब लक्षात घेता, मुद्या क्रं. ३ शी संबंधित माहिती प्रदान न करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांचा निर्णय माहिती अधिकार अधिनियम २००५, कलम ११ (१) खाली केलेली प्रक्रिया ही मा. सर्वोच्च न्यायालय गिरीष रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग यात पारित केलेल्या आदेशाशी सुसंगत आहे. मुद्या क्रं १ व ८ या संबधित माहिती अदयापही तक्रारकर्ता यांना पुरविण्यात आली नाही. त्यावर मुद्या क्रं. ८ यात नमुद केल्याप्रमाणे त्यांच्याशी संबधित वैयक्तिक नस्ती लेखा व वित्त विभागाला पाठविण्यात आलेली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी त्याची छायांकित व प्रमाणित प्रत संबधित विभागाकडुन प्राप्त करून दोन आठवडयाच्या आत प्रदान करावी. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक, अन्न निरीक्षक घनकचरा व्यवस्थापन विभाग, महानगरपालिका यांनी मुद्या क्रमांक १ ची संकलित माहितीबाबत तक्रारकर्ता यांना अवलोकन देवून त्यांनी चिन्हांकित केलेली माहिती प्रदान करावी. तक्रारकर्ता यांना पुरविण्यात आलेल्या माहिती व्यतिरीक्त इतर माहिती व दस्ताऐवजाची ५० पृष्ठांची माहिती विनामुल्य प्रदान करावी, या आदेशासह तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण:नागपूर**

**दिनांक:१६.११.२०२२**

**जावक क्रमांक** 7749 **दिनांक** 28 DEC 2022

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर*

A/S-2022/226-2022/phating